# अक्षय तृतीय निमित्त कानिफनाथ अपंगत्व विद्यापीठ नारेगाव येथे नाश्ता व धान्य वाटप

कानिफनाथ अपंगत्व विद्यापीठ नारेगाव छत्रपती संभाजीनगर येथे आज अक्षय तृतीया दिनानिमित्त दुपारी चार वाजता अट्टल मतचे संपादक श्री रशपाल सिंग अट्टल, श्री शंभुलाल भानुशाली जलाराम गाणी इंडस्ट्री व श्री दत्तात्रय सबनीस सेवानिवृत्त स्टेनो विभागीय आयुक्त कार्यालय यांचे वतीने लहान अपंग मुला-मुलींसाठी नाश्ता व धान्य पुरविण्यात आले.





# बँक सखी ते लखपती दीदींची आधारस्तंभ: कावेरी जाधव यांचा प्रेरणादायी प्रवास



यशकथा

**ग्रामीण** भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'बँक सखी' हे पद केवळ एक नोकरी नसून ती एक क्रांती ठरू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे कावेरी भाऊसाहेब जाधव. २०१८ पासून बँक ऑफ महाराष्ट्राच्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुका, वेरूळ आणि परिसरातील गावांमध्ये त्यांनी आपल्या कार्याचा जो ठसा उमटवला आहे, तो आज हजारो महिलांसाठी दिशादर्शक ठरत आहे.

**बचत गटातून सक्षमीकरणाकडे** – कावेरी जाधव यांचा प्रवास एका सामान्य बचत गटापासून सुरू झाला. चिंतामणी बचत गट आणि संजीवनी स्वयं सहायता समूह पासून. त्यांची जिद्द आणि काम ाप्रती असलेली निष्ठा यामुळे त्यांनी स्वतःला केवळ एका गटापुरते मर्यादित न ठेवता विविध ग्रामसंघ आणि समूहांना जोडण्याचे काम केले. शासनाच्या विविध योजना आणि बँकिंग व्यवहारांमधील दुवा म्हणून त्यांनी अत्यंत प्रभावी भूमिका बजावली आहे.

**'छोटी बँक' म्हणून ओळख** – ग्रामीण भागात बँकेचे व्यवहार करणे, कर्ज मिळवणे किंवा कागदपत्रांची पूर्तता करणे हे आजही आव्हानात्मक मानले जाते. कावेरी यांनी हे आव्हान स्वीकारले. त्यांनी महिलांना मोलाची मदत केली. यात बँकिंग सेवा, नवीन खाते उघडणे, पॅन आणि केवायसी अपडेट करणे, मोबाईल लिंकिंग आणि विमा योजनांचे लाभ मिळवून देणे आणि विमा पॉलिसीच्या पावत्या यांसारख्या किचकट कागदपत्रांची पूर्तता करण्यात त्यांनी महिलांना सुलभता निर्माण करून दिली.

खुलताबाद तालुक्यातील तलाववाडी, आखातवाडा, पिंपरी, पळसवाडी, चिंचोली आणि सांदलवाडी यांसारख्या दुर्गम भागातील महिलांपर्यंत पोहोचून त्यांनी आर्थिक साक्षरता पसरवली. लखपती दीदींचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी कावेरी जाधव यांनी आतापर्यंत १५६ बचत गटांतील सुमारे १५०० महिलांना मार्गदर्शन केले आहे. विशेष म्हणजे, त्यांनी ४० ते ४५ विविध उद्योगांसाठी १कोटी ५२ लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात यश मिळवले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आज अनेक महिला 'लखपती दीदी' झाल्या असून, त्या स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. या संपूर्ण प्रक्रियेत एकही बँक खाते NPA (थकीत कर्ज) झाले नाही, हे त्यांच्या कामाचे आणि महिलांच्या प्रामाणिकपणाचे मोठे यश आहे.

**बँक कामकाजासह सामाजिक बांधिलकी–** बँकिंग कामाव्यतिरिक्त कावेरी जाधव यांनी शासनाच्या विविध सामाजिक योजनांमध्येही सक्रिय सहभाग नोंदवला आहे. आयुष्मान भारत, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, स्वच्छता अभियानाचा प्रसार. मतदार यादी सर्वेक्षण आणि जनगणनेसारख्या महत्त्वाच्या कामांमध्ये त्याचा सहभाग आहे. आरसेटीच्या माध्यमातून दुग्ध व्यवसाय, हॉटेल, फळ विक्री, ज्यूट बॅग निर्मिती, पापड लोणचे उत्पादन आणि कापड व्यवसाय यांसारख्या उद्योगांसाठी महिलांना प्रशिक्षण व स्टॉल मिळवून देण्यासाठी समन्वयक यांची भूमिका बजावली आहे.

**आर्थिक स्वावलंबन आणि सन्मान–** आज कावेरी जाधव आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून दरमहा १५ हजार रुपयांचे उत्पन्न मिळवत आहेत. गावकऱ्यांनी त्यांना दिलेली 'छोटी बँक'ही पदवी त्यांच्यावरील विश्वासाचे प्रतीक आहे. बँकसखी बरोबरच ग्रामीण महिलांच्या जीवनात आर्थिक समृद्धी आणणारी 'लक्ष्मी' म्हणून त्या ओळखल्या जात आहेत.कावेरी जाधव यांनी आपल्या कष्टाने केवळ स्वतःची ओळख निर्माण केली नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढवून एक नवा 'विश्वासबंध' निर्माण केला आहे. ग्रामीण भागातील बँकांची सेवा ही विश्वासाच्या नात्यावर अवलंबून असते. त्याचबरोबर त्या विश्वासास पात्र ठरत महिलाना एक सखी, मैत्रीण म्हणून दिलेला हात तो आर्थिक सक्षमीकरणाचा पाया मजबूत करणारा ठरला आहे.

**– डॉ. मीरा ढास**
माहिती अधिकारी, जिल्हा
माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# ज्ञानवृद्धी, प्रेरणा आणि विचारांची देवाणघेवाण; डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीत महिलांचे नेतृत्व केंद्रस्थानी

## जयंतीचे आयोजन महिलांकडे; भूमी अभिलेख विभागाचा आदर्श उपक्रम

**दिनेश परदेशी**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**





भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १३५ वी जयंती निमित्त, भूमी अभिलेख छत्रपती संभाजीनगर चे प्रबोधिनीत मोठ्या उत्साहात , मोठ्या संख्येत, थाटामाटात साजरी झाली. यावेळेस नियोजन/ आयोजन करण्याचा मान हा प्रथमच महिलावर्ग यांना मिळाला या जयंतीचे समितीचे अध्यक्ष मंगला अंभोरे, उपाध्यक्ष सिमा वाहुळे, निवेदिका श्रीमती. सविता खिल्लारे, सचिव श्रीमती. मिनाक्षी पगारे, कोषाध्यक्ष श्रीमती. कोमल दिवेकर यांचे अतिशय उत्कृष्ट नियोजनामुळे जिल्ह्याचे आपले विभागाचे नांव संपुर्ण महाराष्ट्रात कौतुकास्पद घेतले जात आहे. आजचा कार्यक्रम हा छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रमुख, किशोर जाधव सर उपसंचालक भूमी अभिलेख छत्रपती संभाजीनगर प्रदेश छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा संपुर्ण वेळ दिला व संपुर्ण कार्यक्रमात ते सहभागी झाल्यामुळे उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारीवर्ग यांनी मा. जाधव सर यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

**भूमी अभिलेख छत्रपती संभाजीनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १३५ वी जयंती साजरी**

तसेच त्याच उत्स्फूर्तपणे मा. डॉ. विजय विर जिल्हा अधीक्षक भूमी छत्रपती संभाजीनगर यांनी देखील संपुर्ण वेळ कार्यक्रमात थांबल्याने आणखीन शोभा वाढली. कास्ट्राईब भूमी अभिलेख कर्मचारी संघटना. महाराष्ट्र राज्यचे सरचिटणीस आर. एम.कांबळे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती तर आपण मोठ्या ताठामाठात करतोच याच पद्धतीत महाराष्ट्रातील सर्व महापुरुष यांचे जयंती साजरी केल्या पाहिजेत. या मुळे आपल्या ज्ञानात आणी आपले पाल्यांना एक प्रेरणा मिळते. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते मा. शिवराज जाधव सर निदेशक यांनी तर मंत्रमुग्ध केले. त्यांचे एक एक शब्द हृदयात कोरत होते, आणी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बाबत त्यांनी बरेच बाबींवर प्रकाशमान टाकून उजाळा दिला. त्यामुळेच सर्वांचेच ज्ञानात भर पडली. मा. निलेश उंडे सर यांनी देखील मनोगतच्या माध्यमातून सांगितल. आपले दैनंदिन जीवनात एक तास मोबाईल पासुन दुर राहुन थोडेफार वाचन केले तर वाचन करण्याचा संकल्प केला तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीनिमित्त खऱ्या अर्थाने अभिवादन केले सारखे राहील हा मेसेज देखील महत्वाचा ठरला. छत्रपती संभाजीनगर चे नविन ज्योत नविन नेतृत्व असे सर्वांसोबत मिळुन मिसळून राहणारे आणी संघटन कौशल्य असणारे श्री. विवेक कोठाळे त्याच शैलीच्या आवाजात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीनिमित्त अभिवादन करून घोषणा दिल्या. तसेच भिम गीते यामुळे तर संपुर्ण प्रबोधिनीतील वातावरण भरून गेल. त्यानंतर तर आपले भूमी अभिलेखचे चिमुकले यांनी वेषभूषाचे कार्यक्रमात तर सर्व आनंदात भारून गेले. आशा प्रसन्नमय वातावरणात आपले सचिव देशमुख यांची कन्या कस्तूरी यांचे भाषण होते त्यातील इतके अवघड शब्द आपल्याला देखील बोलता येत नाही असे ऐकून आणखीनच मान्यवर आनंदी झाले त्यानंतर उपसंचालक कार्यालयातील श्रीमती. प्रियंका गायकवाड (अंभोरे) यांची कन्या उर्मी यांची क्लासिकल डान्स आणी गाण्यावर शेवट झाला.. तो खुपच छान वाटला..

आजचे कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यावर यांचेच मुळे आजचा कार्यक्रम झाला त्या सर्वाचेच मनापासुन आभार.. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून उत्स्फूर्त पणे सर्व कर्मचारीवर्ग आणी अधिकारी यांनी सहकार्य केलेत, तसेच ज्या माझे प्रिय असणारे कोणतेच नावाची मानाची आपेक्षा न ठेवता पडद्याआड मदत केले त्याचे देखील मनापासून आभार. एकंदरीत आपण आपले स्वतःसाठी हा कार्यक्रम घेतो,ज्या मुळे आपले ज्ञानात आणी आचरणात बदल झाला पाहिजेत.. तसेच या महापुरुष यांचे आणी इतर असे एकत्र येण्याचे कार्यक्रम घेतले तर विचारांची देवाणघेवाण होते .. हाच महत्वाचा हेतू आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199